

**सिडको : हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशन परिषदेच्या उद्घाटनाप्रसंगी दीपप्रज्वलन करताना क्रिकेटर दिलीप वेंगसरकर. समवेत डी. व्यंकटेशन, प्रदीप शेट्टी, राकेश मेहरा, शेरी भाटिया आदी.** (छाया : राजेंद्र शेळके)

# हॉटेल व्यावसायिक पुन्हा उभे राहतील

## वेंगसरकर : हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असो.च्या परिषदेचे उद्घाटन

**सिडको : पुढारी वृत्तसेवा**

१९८३ च्या विश्वचषकाआधी कर्णधार कपिलदेव यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना, आम्ही येथे जिंकण्यासाठी आलो आहोत, असे उद्गार काढले होते. त्यानंतर भारताने विजय मिळवला. त्याचप्रमाणे 'वी आर हिअर टू विन' या वाक्यानुसार हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट व्यावसायिक कोविडनंतरच्या काळातदेखील यशस्वी होतील, असा विश्वास भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केला.

हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशनच्या ऑफ वेस्टर्न इंडियाद्वारा आयोजित पश्चिम विभागीय परिषदेच्या उद्घाटनाप्रसंगी हॉटेल रॅडिसन ब्लू मध्ये ते बोलत होते. दि. ७ ते ९ ऑक्टोबरदरम्यान तीन दिवस ही परिषद चालणार आहे. व्यासपीठावर पर्यटन मंत्रालयाचे विभागीय संचालक डी. व्यंकटेशन, संघटनेचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी, राकेश मेहरा, शेरी भाटिया उपस्थित होते. परिषदेच्या संयोजन समितीचे प्रमुख डी. एस. अडवाणी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

प्रास्ताविकात अध्यक्ष शेट्टी यांनी कोविड महामारीत सर्वात जास्त नुकसान हॉटेल व रेस्टॉरंट उद्योगाचे झाले असून, आता हळूहळू हा व्यवसाय पूर्वपदावर येत असल्याचे सांगितले. परिषदेत उद्योगापुढील आव्हाने व संधी यावर विचारमंथन केले जाणार आहे.

H&RA
WESTERN INDIA
Estd : 1951